# जैन प्राकृत कथालेखकांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण

**(पुणे विद्यापीठातील तत्त्वज्ञान विभागातर्फे, 'स्त्रीविषयक भारतीय विचारांची स्त्रीवादी समीक्षा' या विषयावर आधारित चर्चासत्रात सादर केलेला शोधनिबंध, दि. २२-२३ फेब्रुवारी २०१३)**


**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**
डॉ. नलिनी जोशी
प्रोफेसर, सेठ एच्.एन्. जैन अध्यासन,
तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ,
पुणे - ४११००७
मोबाईल नंबर : ९४२१००१६१३


**दिनांक :** २३/०२/२०१३

**प्रस्तावना :**

कोणत्याही संस्कृतीचा अभ्यास करताना तिच्या मूल्यांकनाचे निकष म्हणून, तिच्यातील स्त्रीविषयक विचारांची उदारता आणि अनुदारता लक्षात घेण्याचा निकष अभ्यासक वारंवार उपयोगात आणतात. संस्कृत साहित्याच्या संदर्भात हा विचार करताना वेदपूर्वकालीन, वेदकालीन आणि उपनिषत्कालीन स्त्रीचे स्थान कसे गौरवास्पद होते आणि मध्ययुगात ते कसकसे दुय्यम होत गेले - याचे वर्णन भारतीय विद्येचे अभ्यासक नेहमी करतात. 'विचारांचे हेच प्रारूप जैन ग्रंथातील स्त्रीचित्रणाला लागू पडते का ?' - या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयास प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

''तत्त्वज्ञानाच्या आणि भारतीय विद्येच्या अभ्यासकांनी जैनधर्मातील स्त्रीचे स्थान पाहताना जास्तीत जास्त भर नेहमीच मोक्षाच्या संदर्भातील चर्चेवर दिलेला दिसतो. श्वेतांबर परंपरा स्त्रियांना स्त्री जन्मातून मोक्षाचे अधिकारी मानते. २४ तीर्थंकरांमध्ये, 'एकोणिसाव्या मल्ली तीर्थंकर स्त्री आहेत', यावरून श्वेतांबरांची वैचारिक उदारता दिसते. याउलट दिगंबर संप्रदाय, 'स्त्री जन्मातून स्त्रीला मोक्षाला जाता येत नाही', असे मानतो. मोक्षासाठी संपूर्ण अपरिग्रहाची म्हणजे नग्नतेची अट आवश्यक मानतो. यावरून स्त्रियांच्या बाबतीत दिगंबर संप्रदाय सनातनी, अनुदार म्हणजेच स्त्रियांना दुय्यम स्थानावर ठेवणारा आहे.'' - ही झाली मांडणीची रूढ पद्धत !

जैनधर्मातील स्त्रीचे स्थान एवढ्या एकाच निकषावर व्यक्त करणे, हा प्राकृतमध्ये कथालेखन करणाऱ्या जैन आचार्यांवर (कथालेखकांवर) अतिशय अन्याय करणारे आहे. केवळ एका तात्त्विक मुद्याच्या आधारे स्त्रीचे गौणत्व-मुख्यत्व ठरविण्याऐवजी या शोधनिबंधात आपण इ.स.च्या चौथ्या शतकापासून इ.स.च्या बाराव्या शतकापर्यंतचा कालावधी ध्यानात घेणार आहोत. या काळातील कथात्मक साहित्य आरंभी 'अर्धमागधी' भाषेत आणि नंतर 'जैन महाराष्ट्री' या नावांच्या दोन प्राकृत भाषेत लिहिलेले दिसते. या साहित्यातील सुमारे दोनशे कथा एकूण सहा खंडांमध्ये मराठीत अनुवादित केलेल्या आहेत. शोधनिबंधातील निरीक्षणे त्यावर आधारित आहेत.

**स्त्री लेखिका नसणे, ही दुय्यमता आहे का ?**

एक वस्तुस्थिती आपल्याला मान्य केली पाहिजे की, या प्रदीर्घ कालावधीत रचलेल्या कथाग्रंथांचे किंवा सुट्या कथांचे लेखक हे केवळ पुरुषच आहेत. ते मुख्यत: श्वेतांबर साधूच आहेत. त्यांना 'आचार्य' किंवा 'सूरि' या नावांनी संबोधलेले आहे. यावरून प्रथमदर्शनी असा ग्रह होईल की, केवळ ही एक गोष्ट सुद्धा जैन परंपरेतील स्त्रीचे दुय्यमत्व स्पष्ट करावयास पुरेशी आहे. परंतु वस्तुस्थितीचे नीट आकलन होण्यासाठी स्त्री-लेखिका नसण्याची कारणे संक्षेपात पाहू.

* काही वेदसूक्ते व काही उपनिषदातील तुरळक उल्लेख वगळता, स्त्री-लेखिका नसणे हे एकंदर भारतीय

प्राचीन-मध्ययुगीन साहित्याचे वैशिष्ट्य आहे ; फक्त जैनांचे नव्हे.

* याचे मुख्य कारण औपचारिक शिक्षणाचा अभाव हाच आहे. फक्त लिहिण्या-वाचण्यापुरते ज्ञान काही स्त्रियांना घरच्या घरीच देत असावेत.

* प्रारंभापासूनच जैनांच्या चतुर्विधसंघात, साधूंपेक्षा साध्वींची आणि श्रावकांपेक्षा श्राविकांची संख्या, नेहमीच लक्षणीयपणे अधिक आहे. परित्यक्ता आणि विधवा या स्त्रियांना जैनधर्माने, आपली द्वारे खुली ठेवल्याने, ही वस्तुस्थिती समर्थनीय मानावी लागते. कित्येक वेळा साध्वी-दीक्षेनंतर धार्मिक शिक्षणाचा आरंभ झालेला दिसतो. तेही मुख्यत: मौखिकच असावा. शिवाय कुमार अवस्थेमध्ये धर्माच्या ओढीने दीक्षा घेण्याचे प्रमाण स्वाभाविकपणे, पुरुषांमध्ये स्त्रियांपेक्षा जास्त असावे. परिणामी शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने साधुसंघ प्रबळ होता, असेच मानावे लागते.

* श्रावक-श्राविकांबाबत म्हणावयाचे तर श्रावकवर्ग मुख्यत: वैश्यवर्ग होता. व्यावसायिक शिक्षणापेक्षा इतर वेगळे लेखन-वाचन अथवा उच्चशिक्षण श्रावकवर्गाला नसावे. चौदाव्या शतकातल्या 'ठक्कुर फेरु' या श्रावकाचा अपवाद सोडता जैन श्रावकवर्ग स्वतंत्रपणे लेखन करणारा नव्हता. त्यामुळे अर्थातच श्राविकावर्गही त्या काळात लेखनात अग्रेसर नव्हता.

* नमूद करण्यायोग्य मुख्य कारण आहे 'जैन महाराष्ट्री' ही साहित्यभाषा ! ५ ते १२ या शतकांमध्ये जे श्वेतांबर आचार्य कार्यप्रवण झाले ते मुख्यत: राजस्थान, गुजराथ, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश - या भागातील होते. त्यांचा महाराष्ट्राशी आणि महाराष्ट्री भाषेशी दीर्घकाळ संपर्क होता. या काळादरम्यान महाराष्ट्री भाषा 'साहित्यभाषा' म्हणून मान्य व रूढ झालेली होती. जैन आचार्यांनी अर्धमागधीने काहीशी प्रभावित असलेली जैन महाराष्ट्री प्रयत्नपूर्वक निर्माण केली. लेखनभाषा म्हणून स्वीकारली. अर्थातच महाराष्ट्राबाहेरच्या साध्वी व श्राविका त्यात तरबेज नव्हत्या. परिणामी कथालेखन प्रामुख्याने साधुवर्गाने केले.

* अर्धमागधी आणि जैन महाराष्ट्रीतील या विस्तृत कथांमधून स्त्रियांची सर्व रूपे साकार झाली आहेत. त्यातील सूक्ष्मता आणि तलस्पर्शितेचा मुद्दा आपण घेणारच आहोत. ही सर्व कथाबीजे, प्रसंग आणि स्त्री-पुरुष नात्यातले सर्व बारकावे जैन लेखकांनी कोठून आणले ? साधु-साध्वींना भिक्षा देणाऱ्या, प्रश्न विचारणाऱ्या, संवाद साधणाऱ्या आणि विशेष प्रसंगी त्यांच्याकडून समुपदेशनाच्या मार्फत मानसिक आधार प्राप्त करणाऱ्या श्राविकांकडून ! सारांश काय तर विहारकाळात आणि वसतिकाळात गृहस्थ-गृहिणींशी केलेले वार्तालाप, सूक्ष्म निरीक्षणांचे रंग भरून, विशिष्ट साहित्यभाषेत जैन साधुवर्गाने जनसामान्यांसमोर कथारूपाने प्रकट केले आणि ग्रंथबद्धही केले.

सबब, जैन प्राकृत कथा पुरुषलेखकांनी लिहिलेल्या आहेत या कारणास्तव स्त्रियांचे दुय्यमत्व मान्य करण्यापूर्वी, आपण त्यात प्रतिबिंबित झालेल्या समाजाच्या, विशेषत: स्त्रियांच्या, सर्वतलस्पर्शी चित्रणावर एक ओझरती नजर टाकू.

**समाजाचे सर्वतलस्पर्शी चित्रण :**

या शोधनिबंधात आधारभूत म्हणून अर्धमागधी आणि जैन महाराष्ट्री या प्राकृत भाषांमधील सुमारे दोनशेहून अधिक कथा निवडल्या आहेत. या सर्व कथा श्वेतांबर साधुवर्गातील आचार्यांनी लिहिल्या आहेत. त्यातील सुमारे ९० टक्के कथा पारंपारिक आहेत. कथांच्या धाटणीवरून असे दिसते की त्या नुसत्या पुस्तकी नसून प्रवचनात सांगितल्या जात असाव्यात, आजही सांगितल्या जातात. (अर्थात् त्यातील वेचक). कथांमधील पात्रे जैन आणि अजैन आहेत. संख्या मोजली तर अजैन पात्रेच बहुधा दुप्पट असतील. धर्माच्या दृष्टीने ही पात्रे जैन, हिंदू (त्यातही भागवत इ. संप्रदाय) आणि बौद्ध तीनही धर्मांची आहेत. वर्णव्यवस्थेनुसार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र (कारू शूद्र) आणि अतिशूद्र अशा सर्व वर्णांची आहेत. 'मनुष्यजाति: एकैव' (आदिपुराण ३८.४५) असा जैन तत्त्वज्ञानाचा दृष्टिकोण आहे. 'समता सर्वभूतेषु सर्वाचरणानां परमाचरणम्' असा नैतिक उपदेश जैन आचार्य सोमदेवसूरि 'नीतिवाक्यामृत' ग्रंथातून देतात. (१.४पृ.९)

कथांमधील पात्रांची निवड करताना जैन लेखक या निकषांचे पालन करतात. जैन श्रावकवर्गामध्ये वैश्यवर्णाचे प्राबल्य असल्याने सुमारे एक-तृतीयांश कथांमध्ये मुख्य पात्रे श्रेष्ठी, वणिक्, सार्थवाह - अशी असतात. परंतु दुय्यम

पात्रे सर्व धर्म–वर्णांची दिसून येतात. आर्थिक दृष्टीने अति–समृद्ध–संपन्न स्तरापासून दास–दासींपर्यंत सर्वांचे चित्रण येते. स्त्री–पात्र–विरहित कथा जवळजवळ नगण्य आहेत. सुमारे एक–तृतीयांश कथांची शीर्षके स्त्रियांच्या नावांवरून दिलेली आहेत.

कथांच्या ओघात लेखकांनी पात्रांच्या तोंडून कोठेही अवास्तव एकांगी स्त्री–निंदा अथवा अतिरिक्त स्तुती केलेली दिसत नाही. पुरुषांच्या अंगी जसे सद्गुण–दुर्गुण असतात त्याच प्रमाणात ते स्त्रियांच्याही अंगी असतात – ह्या गृहीतकावर या कथा उभारलेल्या आहेत.

कथांची सर्वतलस्पर्शिता आणि वैविध्य, सहा खंडात मराठीत अनुवादित केलेल्या पुस्तकांच्या आधारे येथे दिले आहे. त्यातील पहिला क्रमांक खंडाचा असून, दुसरा पृष्ठ क्रमांक आहे.

१.१९ या कथेत गैरव्यवहाराने अमाप संपत्ती मिळवणारा नागदत्त आणि त्याची पत्नी शीलवती आहे.

१.२५ मध्ये फक्त घरात शूरपणा करणाऱ्या सोनाराला धडा शिकवणारी पत्नी यशोमती आहे.

१.३३ मध्ये विरक्त पतीला अकारण संसारात गुंतवल्याबद्दल हळहळणारी व नंतर चूक दुरुस्त करणारी पत्नी आहे.

१.४१ मधील विद्याधराचा कर्मसिद्धांतावर विश्वास आहे तर विद्याधरी दयाळू, भावनाशील आहे.

१.४८ मध्ये धारिणी देवीचे अकाल–मेघाचे डोहाळे पुरविणारा सावत्र पुत्र ‘अभयकुमार’ आहे.

१.५७ मध्ये देवशर्मा ब्राह्मणाची पत्नी त्यास चौर्यकलेचा वापर करून पैसा मिळविण्यास सांगते आहे.

१.६६ मध्ये माहेरी धार्मिकता आणि सासरी धर्माविषयी अनास्था असलेल्या शीलवतीची चातुर्यकथा आहे.

१.७१ तसेच २.५६ मध्ये कष्ट करून झोपडीत रहाणाऱ्या एकट्या वृद्धा आहेत. पहिली चलाख आहे तर दुसरी स्वार्थी.

१.९६ मध्ये धूर्त नर्तिकेच्या गर्वहरणाची कथा येते.

१.१०० मध्ये ‘खरमुखी’ नावाला शोभेल अशी फाटक्या तोंडाची ब्राह्मणी आहे.

१.१०४ मध्ये विजय क्षत्रियाच्या सुमती कन्येच्या समस्यापूर्ण विवाहाची कथा येते.

१.१०८ या मिश्किल कथेत राणीची बालमैत्रीण असलेल्या कुंभारणीच्या गाढवाचे पिल्लू मरण्याचा वृत्तांत आहे.

१.११६ मध्ये तीन जावयांचे भिन्न स्वभाव ओळखून तीन मुलींना वागण्याच्या तीन तऱ्हांचा उपदेश देणारी चतुर ब्राह्मणी आहे.

१.१४४ मध्ये धूर्त अत्तरविक्याची साधीभोळी पत्नी आहे.

२.५ मध्ये जैन धर्मात कुशल असलेली ब्राह्मणपत्नी आहे.

२.२५ मध्ये वृद्ध, निपुत्रिक, गरीब ब्राह्मणाची कुटिल, कंजूष पत्नी आहे.

२.४९ मध्ये गावातल्या भांडणतंट्यांना कंटाळून गाव बदलायला तयार झालेली गृहिणी आहे.

२.६६ मध्ये विणकराची मुलगी कालिंदी आणि राजकन्या मदनमंजिरीची बोधक कथा आहे.

२.७५ मध्ये एका धनिकाच्या आवडत्या–नावडत्या दोन पत्नींची खुसखुशीत कथा आहे.

२.१२१ मध्ये दोनच जागा असलेल्या यांत्रिक विमानात तिघांनी बसण्याचा हटवादीपणा करणारी – परिणाम भोगणारी राणी आहे.

२.१३७ मध्ये राजकन्या अणुल्लिकेच्या अपहरणाचा वृत्तांत आहे.

२.१४६ मध्ये जैन कर्मसिद्धांतावर विश्वास असणारी, पित्याला खडे बोल सुनावणारी मदनासुंदरी आहे.

३.१६ मधील शेतकऱ्याची हट्टी, गर्विष्ठ कन्या स्वत:च स्वत:साठी वरसंशोधन करायला बाहेर पडली आहे.

३.१९ मध्ये पारसिक अश्वाधिपतीची देखणी, बुद्धिमान कन्या आहे.

३.२६ मध्ये व्यापाऱ्याकडून फसवणूक झालेली साधीभोळी गवळण आहे.

३.३९ मध्ये रिपुमर्दन राजाची हट्टी, रागीट कन्या ‘भावना’ आहे.

३.४१ मध्ये श्रीदत्त श्रेष्ठींची एकुलती एक कन्या 'श्रीमती' आहे.

३.५४ मध्ये विधवा आईचा मूर्ख, सांगकाम्या मुलगा आहे.

३.७५ मध्ये अंतर्ज्ञानी 'जिनमती'चा चांडाल शिष्य आहे.

३.९२ मध्ये शेतातील खळ्यात बसून रोळीने मोहरी रोळणारी आजीबाई आहे.

३.९९ मध्ये कुस्तीत पताका जिंकल्याने खूष झालेली अट्टणमल्लाची पत्नी आहे.

३.१०२ मध्ये पतीच्या पश्चात् एकत्र कुटुंबाचा गाडा समर्थपणे चालवणारी भद्रा सेठाणी आहे.

३.१४६ मध्ये एकुलत्या एका मुलाला सारथ्यकर्म शिकण्यासाठी दूरदेशी पाठविणारी विधवा माता आहे.

३.१४८ मध्ये दरोडेखोर भावाला सहाय्य करण्यासाठी स्मशानात राहणारी बहीण आहे. ५.३६ मध्येही अशीच भावाबहिणींची जोडी आहे.

४.४ मध्ये श्रावस्ती नगरीतील शंख-उत्पल्ला हे जोडपे आहे.

४.४६ मध्ये आर्थिक व्यवहारात कुशल रोहिणी आहे.

४.५२ मध्ये स्त्री-तीर्थंकर मल्ली हिचे आख्यान आहे.

४.६४ मध्ये तेतलीपुत्र अमात्याच्या सुवर्णकाराच्या कन्येच्या विवाहाची हकिगत आहे.

४.६६ मध्ये आपल्याच पुत्रांचे हातपाय तोडणाऱ्या दुष्ट राजाची बुद्धिमान राणी पद्मावती आहे.

४.७१ मध्ये नागश्री ब्राह्मणी, श्रेष्ठीकन्या सुकुमारिका आणि क्षत्रियकन्या द्रौपदी - यांची पूर्वजन्म-पुनर्जन्मावर आधारित दीर्घ कथा आहे.

४.१०१ मध्ये सद्दालपुत्र-अग्निमित्रा हे कुंभार पति-पत्नी आहेत.

४.१०३ मध्ये श्रीमंत, सुंदर, धनलोभी, मत्सरी आणि प्रबळ कामभावना असलेली रेवती आहे.

४.११३ मध्ये अर्जुन नावाच्या माळी आणि बंधुमती माळीण यांची एक विषण्ण करणारी कथा येते.

४.१२३ मध्ये विकलांग (जणू मांसाचा गोळाच) असणाऱ्या पुत्राला तळघरात लपवून त्याची देखभाल करणारी राणी आहे.

४.१४४-४५ मध्ये राजीमती राजकन्येची दोन अनोखी रूपे आहेत.

५.१ मध्ये गर्भपाताला नकार देणारी गणिका कुबेरसेना आहे.

५.१३ मधील पट्टराणी सत्यवतीला हस्तिदंती महालाचे डोहाळे लागले आहेत.

५.२६ मध्ये नवऱ्याच्या मित्रावर आषक झालेली पट्टराणी 'चुलनी' आहे.

५.४० मध्ये दोन विरुद्ध स्वभावाच्या सवती आहेत.

५.४५ मध्ये नवऱ्याचे न ऐकता दागिन्यांनी मढून बसणारी आळशी गृहिणी आहे.

५.६६ मध्ये दासी-महोत्सवात जायला उत्सुक दासी आहे.

५.७० ; ५.८६ मध्ये दोन राजांमध्ये तह घडवून आणणाऱ्या दोन साध्वी आहेत.

५.९४ मध्ये चित्रकार पित्याला न्याय मिळवून देणारी, स्वत: चित्रकलेत प्रवीण असलेली कन्या कनकमंजिरी आहे.

५.१०० मध्ये आकाशगमनाची विद्या असलेली राजकन्या आहे.

५.१५८ मध्ये महावीरांच्या ३६००० साध्वींची प्रमुख प्रवर्तिनी चंदना हिचा वृत्तांत आहे.

५.१६७ मध्ये घरातल्या सर्वांना आत्महत्या करायला लावणारी श्रेष्ठीपत्नी आहे.

६.२ मध्ये दरिद्री, भणंग परंतु कलानिपुण मूलदेवावर सर्वस्व ओवाळून टाकणारी गणिका देवदत्ता आहे.

६.३४ मध्ये श्राविका असल्याचे ढोंग करून अभयकुमाराला पकडून देणारी गणिका आहे.

६.४७ मध्ये पुरुषांना अनेक कपटकारस्थाने करून वश करणारी वेश्या कामलता आहे.

६.६९ मध्ये रोजच्या जेवणातले पळी-पळी तेल वाचवून मंदिरात उत्सवाच्या दिवशी दीपमाळ लावणारी दासी

आहे.

६.८८ मध्ये 'ध' चा 'मा' करणाऱ्या आनंदीबाईसारखी सावत्र मुलाचा काटा काढणारी, सम्राट अशोकाची राणी आहे.

६.९५ मध्ये माळीकन्या पुष्पा, श्रेष्ठीकन्या सुभद्रा आणि राजकन्या सोमश्री, एकाच पतीच्या पत्नी बनण्याची मनीषा बाळगून आहेत.

६.९७ मध्ये पशुपक्ष्यांची भाषा जाणणारी श्रेष्ठीस्नुषा आहे.

६.१०६ मध्ये स्त्रीलंपट राजा प्रद्योतला वठणीवर आणणारी मृगावती आहे.

६.११८ मध्ये अप्रतिम लावण्यामुळे आयुष्यभर पुरुषांच्या लालसी नजरांशी सामना करणारी 'तारा' आहे.

६.१२५ मध्ये कामवासनेने लंपट झालेल्या पाच सत्ताधारी पुरुषांना वठणीवर आणणाऱ्या सासू-सुना आहेत.

६.१२६-१३५ मध्ये रुक्मिणी-सत्यभामेच्या आंबटगोड कथा आहेत.

६.१५८ मध्ये डोंबाऱ्याची कुशल कन्या आणि तिचे धूर्त वडील आहेत.

६.१७२ मध्ये गुरूंजवळ पर-पुरुष-त्यागाचे व्रत घेणारी श्राविका आहे.

६.१७५ मध्ये सतत एकमेकींवर कुरघोडी करणाऱ्या सासू-सुना आहेत.

६.१८९ मध्ये अपभ्रंश भाषेत शीघ्रकाव्य करणाऱ्या सासू-सुना आहेत.

६.२०५ मध्ये वादविवादात सतत जिंकणारी भिल्लकन्या आहे.

६.२१३ मध्ये धूर्तता व दुष्टतेचा कळस असणारी 'नागिनी' आहे.

६.२२८ मध्ये लोभी सासऱ्याला धडा धिकवणाऱ्या सुना आहेत.

६.२२९ मध्ये 'स्थूलिभद्र' या प्रख्यात जैन आचार्यांच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका बजावणारी कोशा वेश्या आहे.

६.२३८ मध्ये चाणक्याच्या इतिहासाशी निगडीत अशा अमात्य शकटालाच्या सात कन्या विलक्षण स्मरणशक्तीच्या आहेत.

एवढ्या लांबलचक आढाव्यावरून जैन लेखकांच्या कथाविश्वाची समग्रता, भावभावनांची सूक्ष्मता आणि खास करून स्त्री-पुरुष चित्रणातील त्यांची तटस्थ न्यायवृत्ती चांगलीच मनावर बिंबते. पुरुषलेखक असूनही स्त्रीमनात शिरण्याची अवघड कला त्यांना चांगलीच अवगत आहे असे दिसते. स्त्रीच्या सर्व भूमिका आणि नातेसंबंधातील सर्व गुंतागुंतीच्या भावछटा त्यांनी साकारल्या आहेत.

कन्या, बहीण, पत्नी, आई, सून, जाऊ, सवत, मावशी या आणि अशा अनेक नात्यांच्या रूपात या स्त्रीविश्वातील स्त्रिया वावरत आहेत. आपल्या रोजच्या जीवन व्यवहारातल्या अने घटना, या कथांत घडताना दिसतात.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्त्रीचे 'दुय्यमत्व' आणि पुरुषाचे 'श्रेष्ठत्व' असा चष्मा लावून बघण्याचे त्यांनी पूर्ण टाळले आहे. पति-पत्नीच्या नात्याने आयुष्यभर बांधले गेल्यावर त्यांच्यातील प्रधान-गौण भाव विशेषच जाणवू लागतो. यासाठी या संबंधावर अधिक प्रकाश टाकू.

**विवाहाचे वय आणि पति-पत्नी संबंध :**

इसवी सनाचे चौथे-पाचवे ते बारावे शतक या अवधीतील या कथांमध्ये बालविवाहाचा अपवादात्मक एकही उल्लेख नाही. दोन मित्रांनी एकमेकांच्या पुत्र-कन्यांमध्ये विवाह करावयाचा हे ठरविलेले दिसले तरी ते विवाहयथायोग्य काळी झाले आहेत. राजकन्यांची स्वयंवरे वराची निवड करणे, त्यासाठी 'पण लावणे' - याची परिपक्वता आल्यावरच स्वयंवरे झालेली दिसतात. श्रेष्ठी आणि इतर मध्यम कुटुंबात सुद्धा 'मुलगी तारुण्यात आली, आता वय-रूप-कुल-अयन-वर्ष इत्यादि लक्षात घेऊन वर शोधला पाहिजे' - असा विचार वडिलांच्या मनात आल्याचे रंगविलेले दिसते. मुलीचा हट्टीपणा लक्षात घेऊन शेतकरी सुद्धा मुलीला वराच्या निवडीचे स्वातंत्र्य देतो. 'तारुण्यात पदार्पण' याचा

भावार्थ लक्षात घेता 'ऋतुप्राप्तीपूर्वी स्त्रियांचे विवाह होत असत' – असा निष्कर्ष निघत नाही. एकंदरीत विवाहाच्या वेळी सामान्यत: मुलीचे वय १५-१६ आणि मुलाचे वय २०-२१ असावे.

कथांच्या ओघात पति-पत्नींचे अनेक संवाद व प्रसंग येतात. बहुतांशी त्यांचे संबंध मैत्रीपूर्ण, खेळीमेळीचे दिसतात. अनेकदा एकमेकांच्या उणीवांची जाणीव करून दिलेली दिसते. तिचा सल्ला विचारला जातो आणि मुख्य म्हणजे तो ऐकला जातो. पत्नीचा सल्ला बरेचदा अतिशय व्यवहार्य असतो. अपत्य होत नसेल तर दोघे मिळून नवस करतात. 'मुलगा अथवा मुलगी होऊ दे' – असे म्हणतात. नवस फेडायलाही दोघे जातात. पैसे मिळविण्यासाठी पतीला उद्युक्त करणाऱ्या स्त्रिया दिसतात. आजारी पती संशयावरून पत्नीला बाहेर काढावयास निघतो तेव्हा घरातील कामवाली बाई, मालकाशी धिटाईने बोलून निराकरण करते. बहुपत्नीत्व समाजात रूढ असल्याने स्त्रियांनी बहुधा जुळवून घेतलेले दिसते. सवतीमत्सर आणि त्यातून घडणाऱ्या भयानक घटना अतिशय अल्प आहेत. दोन पत्नींना वेगळे ठेवण्याचीही उदाहरणे आहेत.

सारांश, समाजात जे जसे जितके आहे, तितके रंगविले आहे. पतीचा वरचष्मा, पत्नीला खच्ची करणे, तिचा दुय्यमपणा – असे प्रारूप लेखकांनी समोर ठेवलेले नाही. तिला अनुकंपनीय, गरीब बिचारी किंवा दुर्लक्षणीय मानलेले नाही. तिची अतिरेकी स्तुती नाही. चांगले काम केल्यास शाबासकी आहे. प्राचीन जैन आगमग्रंथात काही भाग स्त्री निंदात्मक आहेत (जसे – सूत्रकृतांग – स्त्रीपरिज्ञा ; तंदुलवैचारिक प्रकीर्णक), ते या लेखकांसमोर आहेत तरी कथांमध्ये त्यांनी सरसकट निंदात्मकता स्वीकारलेली नाही.

'वसुदेवहिंडी' ग्रंथातील एका विशेष परिच्छेदाकडे लक्ष वेधते – ज्यावरून सर्वच कथालेखकांच्या स्त्रीचित्रणावर प्रकाश पडेल. अगडदत्त नावाचे मुनी त्यांच्या आयुष्यात आलेल्या सुंदर परंतु आतल्या गाठीच्या, दुष्ट आणि व्यभिचारी श्यामदत्तेचे वर्णन करून स्त्रीनिंदा करू लागतात. अगडदत्ताचे गुरू त्याला सांगतात – 'एका उदाहरणावरून सरसकट विधाने करू नकोस. सर्व स्त्रिया ह्या श्यामदत्तेसारख्या नसतात.' असे म्हणून ते पतिनिष्ठ, चतुर, प्रसंगावधानी व धाडसी धनश्रीची कथा सांगतात.

जैन प्राकृत कथांमधील स्त्रीविचार १३ मुद्यांमध्ये विभागून यानंतर नेमकेपणाने प्रस्तुत केला आहे.

**(१) जैन परंपरेत 'सती' शब्दाचा विशेष अर्थ, पातिव्रत्य-संकल्पना :**

पतीच्या प्रेमाखातर, अतीव पतिनिष्ठेमुळे, त्याच्या चितेवर सहगमन करणारी 'सती' जैन कथांमध्ये दिसत नाही. अहिंसेला सर्वाधिक प्राधान्य देणाऱ्या या धर्माने हवा, पाणी, पशु-पक्षी आणि अखेरीस मानव यांच्याविषयी कमालीची संवेदनशीलता व्यक्त केली आहे. सर्वजीवसमानतावादावर भर देणाऱ्या जैन धर्मातील तत्त्वज्ञानाची चौकट सतीच्या रूढीला कोठेही स्थान देत नाही. 'सती' हा शब्द 'साध्वी'वाचक असून अशा सोळा सतींची म्हणजेच अत्युच्च आध्यात्मिक प्रगती साधलेल्या स्त्रियांची नावे नमूद करण्यात आली आहेत.

साहजिकच व्रतांच्या संदर्भात 'पतीचे दीर्घायुष्य', 'जन्मोजन्मी हाच पती' – अशा हेतुपूर्तीसाठी केलेल्या व्रतांनाही स्थान नाही. अकराव्या शतकात लिहिलेल्या 'कुमारपालप्रतिबोध' ग्रंथात सतीच्या हिंदू परंपरेवरील प्रतिक्रिया स्पष्ट नोंदविलेली दिसते. एका श्रेष्ठींची विधवा पत्नी तिच्या स्नुषांना चितेवर सहगमन करण्यापासून परावृत्त करते. एक आचार्य त्यांना मौल्यवान् मानवी आयुष्याचा उपदेश देतात. (६.३४). 'हिचा पती कोण ?' या शीर्षकाच्या मार्मिक कथेत तर प्रेयसीच्या प्रेमाखातर तिच्या चितेवर चढणाऱ्या प्रियकराची 'पती' म्हणून निवड केली आहे. (१.१०७). अर्थात् कथेच्या ओघात त्याला अमृतसिंचनाने जिवंत केले आहे खरे, परंतु सतीच्या प्रथेवरील ही पुरुषलक्ष्यी प्रतिक्रिया वेगळी व बोलकी आहे.

**(२) गर्भपात आणि भ्रूणहत्या :**

'विपाकसूत्र' नावाच्या अर्धमागधी ग्रंथातील एका कथेनुसार, मृगावती राणीला गर्भवती अवस्थेत तीव्र वेदना होऊ लागतात. ती गर्भपाताचा विचार आणि प्रयत्न करते. राजा तिला या अमानुष विचारापासून परावृत्त करतो. दुर्दैवाने

ती सर्व प्रकारे विकलांग असलेला भ्रूणास जन्म देते. तो भ्रूण श्वासोच्छ्वास मात्र घेत असतो. त्याला उकिरड्यावर फेकून देण्याच्या विचारात असलेल्या राणीला, तो राजा, परावृत्त करतो. त्याच्या देखभालीची आज्ञा देतो. (४.१५). याउलट, 'वेश्यांना काय करावयाची मुलेबाळे ?' असा प्रश्न विचारून, वेश्यामाता 'कुबेरदत्ता' वेश्येला गर्भपाताचा सल्ला देते. कुबेरदत्ता त्यांना जन्म देण्याचा दृढ निर्धार करते. त्यानुसार पुत्र-कन्या अशा जुळ्यांना जन्म देते.आईच्या दबावाला बळी पडते खरी परंतु योग्य व्यवस्था लावूनच त्यांचा त्याग करते. (५.५). ईसवी सनाच्या चौथ्या-पाचव्या शतकातल्या 'वसुदेवहिंडी' ग्रंथातले असे संदर्भ स्त्रीच्या मातृत्वाच्या हक्काविषयीची जागृतता दाखवतात.

विपाकसूत्रातील याआधीच्या कथेत गर्भपात-भ्रूणहत्याविषयक पुरुषी विचारांची प्रगल्भता अधोरेखित केली आहे. भ्रूणहत्येविषयीची संवेदनशीलता स्त्री आणि पुरुष दोघांनाही स्वभाव आणि परिस्थितीनुसार असते अगर नसते - असेच या कथांमधून सूचित होते.

### (३) विधवा, परित्यक्ता आणि पुनर्विवाह :

जैन परंपरेतील प्रथम तीर्थंकर ऋषभदेव यांची अनेक चरित्रे लिहिली गेली आहेत. त्यांच्या काळात म्हणजे परंपरेनुसार लाखो वर्षांपूर्वी युगलियांचा काळ होता. त्या काळात एक मुलगा व एक मुलगी अशी जुळीच जन्माला येत. मोठे झाल्यावर तेच एकमेकांचे पति-पत्नी होत असत. ऋषभनाथांनी पहिला विवाह याच प्रकारे केला. परंतु त्यांच्या काळात, एका दुसऱ्या जोडप्यातला पती अपघाताने मरण पावला. म्हणजे आजच्या अर्थाने ती विधवा झाली. ऋषभनाथांनी तिच्याशी विधिवत् विवाह केला. म्हणजे आजच्या दृष्टीने तो विधवाविवाह किंवा पुनर्विवाह होय. युगात विधिपूर्वक विवाहाची परंपरा आणि त्याहीपुढे जाऊन विधवाविवाहाची प्रथा त्यांनीच चालू केली.

प्राकृत कथांमधून सामान्यत: असे दिसते की विधवा आणि परित्यक्ता या श्राविका किंवा साध्वी बनून धार्मिक जीवन व्यतीत करीत असत. तथापि काही वेचक कथांमध्ये वेगळे विचार प्रस्तुत केलेले दिसतात.

स्वत:च्या मनाविरुद्ध परस्पर विवाह केलेल्या आपल्या मुलीच्या नवऱ्याचे म्हणजे जावयाचे प्राण घेण्याचे विचार एक पिताजी करतात. आजच्या परिभाषेत हे 'ऑनर किलिंग'चे विचार आहेत. प्रत्यक्षात ते तसे करीत नाहीत पण वरील प्रसंगी उद्गारतात की, 'माझी मुलगी विधवा झाली तरी चालेल, मी तिचा पुनर्विवाह करून देईन.' (६.२२). बाराव्या शतकात लिहिलेल्या या कथेतील विचार खरोखरच पुनर्विचारणीय आहेत.

तेतली अमात्य आणि त्याची पत्नी पोट्टिला, हे एक वेगळेच जोडपे आहे. काही कारणाने त्यांच्यात तीव्र मतभेद होतात. संबंधविच्छेद होऊनही तेतली अमात्य तिची घरातच परंतु वेगळी व्यवस्था लावून देतो. एका अर्थाने ती परित्यक्तेचे जीवन जगत असूनही समस्येच्या प्रसंगी दोघेही एकमेकांचा सल्ला घेतात. (५.६६-६७). ''परस्पर समजुतीने घटस्फोट घेतले तरी आम्ही अजूनही एकमेकांचे चांगले मित्र आहोत'' - या अत्याधुनिक विचारसरणीचे हे मध्ययुगीन पडसाद आहेत, असे म्हणावयास काही हरकत दिसत नाही.

सुकुमारिका नावाच्या कन्येचे वडील, तिच्या पहिल्या अयशस्वी विवाहानंतर तिचा पुनर्विवाह करण्यास तयार होतात. (४.७७).

वरील तीनही प्रसंग प्रत्यक्षात घडलेले असोत अथवा नसोत, जैन कथालेखकांच्या उदार दृष्टीचे द्योतक मात्र ते खचितच आहेत.

### (४) स्त्रियांच्या जीवनातील राजकीय संदर्भ :

जैन कथालेखकांच्या प्राकृत कथांमध्ये, आजूबाजूच्या राजकीय परिस्थितीच्या संदर्भात स्त्रियांचा केवळ प्रतिकात्मक नव्हे तर सकारात्मक सहभाग दृष्टोत्पत्तीस येतो. कथा कोणत्याही विषयावरील असो, प्रदेश-नगर-राजा-राणी-मंत्रिमंडळ-दरबारातल्या विविध श्रेणी यांचा तपशील हमखास दिसतो. कथानकाच्या संदर्भात काही वेळा तो अनावश्यक वाटला तरी कथालेखकांच्या राजकीय जाणिवांची कल्पना त्यावरून येते.

एका अर्धमागधी कथेत, पद्मावती या कर्तृत्वसंपन्न, खंबीर राणीने अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय स्वतंत्रपणे घेऊन, कुशल अमात्याच्या मदतीने राजपुत्राचे योग्य संगोपन-शिक्षण कसे केले, त्याची विस्तृत हकिगत समजते. आपल्याच पुत्रांना भावी प्रतिस्पर्धी समजून त्यांच्यात व्यंग निर्माण करणाऱ्या निर्घृण राजाविरुद्ध पद्मावतीने केलेले हे यशस्वी बंड स्त्रियांच्या अचूक निरीक्षणशक्तीवर प्रकाश टाकते. (४.६४-६६).

'प्रश्नव्याकरण' नावाच्या ग्रंथात 'मैथूनमूलक' युद्धांची यादी दहा स्त्रियांच्या नावानिशी दिली आहे. सीता, द्रौपदी इत्यादि परिचित आणि काही अपरिचित नावेही त्यात आहेत. दोन राजांमधील युद्धे त्या स्त्रियांच्या निमित्ताने झाली असली तरी टीकाकाराने स्त्रियांना लक्ष्य करून अनुदार विचार प्रकट केलेले नाहीत. उलट पुरुषांमधील अत्यधिक मैथुनासक्तीच अधोरेखित केली आहे. (प्रश्नव्याकरण पृ.१६५).

जैन महाराष्ट्री प्राकृतातल्या एका कथेत, राजहंस नावाचा राजा आपल्या पत्नीला, 'देविनी'ला राजकीय सल्ला विचारतो. राणी म्हणते, 'महासेन राजाला तुम्ही पराभूत केले असले तरी तो पराक्रमी आणि सुस्वभावी आहे. त्याला बंदिवान न करता आदरपूर्वक निरोप द्या.' राणीची राजशिष्टाचारातील परिपक्वता यातून दिसते. विशेष म्हणजे या सल्ल्याचा आदर करून राजा त्याची यथायोग्य अंमलबजावणी करतो. (६.३१).

उत्तराध्ययनसूत्रावरील 'सुखबोधा' या प्राकृत टीकेत दोन वेगवेगळ्या प्रसंगी, दोन साध्वी, युद्धखोर राजांमध्ये सामोपचाराचे वातावरण तयार करून, कशा प्रकारे युद्धबंदीचा तह घडवून आणतात - याचे प्रत्ययकारी वर्णन येते. त्या दोन कथांपैकी एक कथा चंपानगरीचा राजा दधिवाहन आणि कलिंगचा राजा करकंडू - यांच्या संदर्भातीलआहे. या युद्धाला ऐतिहासिक संदर्भ देखील आहे, असे जाणकारांचे मत आहे. (५.७०-९१).

कुमारपालप्रतिबोधातील कथाभागानुसार राणी गर्भवती असताना राजा मरण पावतो. राणी कन्यारत्नाला जन्म देते, विषण्ण होते. मंत्री समजूत घालतात. 'पुत्र झाला'-असे घोषित करतात. विवाहापर्यंत ती कन्या पुरुषवेश धारण करून मंत्र्यांच्या मदतीने राज्यकारभार करते. (६.१९१).

जैन प्राकृत कथांमधील गणिकांचे चित्रण, कौटिलीय अर्थशास्त्रात वर्णित गणिकेच्या कार्यकलापाच्या संदर्भात खूप मिळतेजुळते आहे. विविध कथांमध्ये या गणिका राजदरबारात पदविभूषित आहेत. त्या रूपवती, कलानिपुण, बुद्धिमान, अठरा देशीभाषांमध्ये निपुण आणि राजकीय घडामोडींमध्ये सक्रिय दिसतात. हेरगिरी तर त्या करतातचपरंतु इतरही प्रत्यक्ष राजकीय कार्यांमधे महत्त्वाचा वाटा उचलतात. (६.३३ ; ६.१४६). गणिका आणि वेश्या वेगवेगळ्या आहेत. त्यांचा विचार वेगळ्या संदर्भात आणि अधिक समाजगामी आहे. तो नंतर करू.

राजदरबारातील महत्त्वपूर्ण पदांपैकी एक पद असे नगरश्रेष्ठीचे. नगरश्रेष्ठी हे प्राय: जैन श्रावक असल्याने जैन कथालेखकांनी त्यांची विशेष दखल घेतलेली दिसते. श्रेष्ठीपत्नी 'श्रीदेवी' राजाची गूढ समस्या सोडवू शकेल असा विश्वास श्रेष्ठी देतात. श्रीदेवी राजाला घरी येण्याची अट घालते. राजा ती मानतो. श्रीदेवी राजाला समस्येची उकल सांगते. स्त्रियांच्या सल्ल्याचे, बुद्धिमत्तेचे महत्त्व सांगणारी ही कथा अकराव्या शतकातील आहे. (६.७८). 'चंद्रकांता' ही दुसरी श्रेष्ठीकन्या, राजाच्या गूढसमस्येचे उत्तर म्हणून समाजातल्या चार लोकांना स्वत: रथात बसवून, सारथ्यकरीत राजदरबारी जाते. दरबारात मानसन्मान प्राप्त करते. (२.१०७). एकूण २०० प्राकृत कथांचा शोध घेऊन ही ९-१० उदाहरणे प्रस्तुत केली आहेत. स्त्रियांची राजकीय प्रगल्भता दाखविण्यात जैन लेखक यशस्वी झाले आहेत, असे म्हणण्यास काहीच प्रत्यवाय दिसत नाही.

### (५) स्त्रियांना अवगत असलेल्या कला-विद्या :

वयाची आठ वर्षे पूर्ण झाल्यावर, गुरुगृही पाठवून औपचारिक शिक्षण घेतल्याचे उल्लेख ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य या त्रिवर्णातील पुरुषवर्गासंबंधी आढळतात. स्त्रियांसबंधी आढळत नाहीत. उपनिषदात जशा गार्गी-मैत्रेयी इ. निवडक ब्रह्मवादिनी दिसतात, त्याप्रमाणे ऋषभदेवांच्या कन्या ब्राह्मी व सुन्दरी या अनुक्रमे लिपिविज्ञान आणि गणितात प्रवीण असल्याचे उल्लेख जैन चरित-पुराणात दिसून येतात. ऋषभांनी स्त्रियांसाठी ६४ कला सांगितल्या असे म्हटले जाते पण

जैन कथासाहित्याच्या उत्कर्षकाळात (इ.स.४ थे शतक ते १२ वे शतक) स्त्रियांच्या औपचारिक कला- शिक्षणाचा अपवादात्मक उल्लेखही आढळत नाही. स्त्रियांना अवगत असलेल्या विविध कलांचे उल्लेख मात्र विपुल प्रमाणात असल्याने असा तर्क करता येतो की उच्चवर्णीयांमध्ये रीतसर औपचारिक शिक्षण घरी दिले जात असावे. मध्यम आणि निम्न स्तरात जवळच्या नातलगांकडून त्या सराव आणि अभ्यासाने आत्मसात केल्या जात असाव्यात.

नन्द-शकटालविषयक कथेत शकटालाच्या सात मुली बुद्धिमान आणि तीव्र स्मरणशक्तीच्या दिसतात. त्यांना क्रमाने एकपाठी, द्विपाठी, त्रिपाठी --- असे संबोधले आहे. स्मरणशक्तीचे हे प्रयोग त्या पाटलिपुत्रात नंद राजासमोर भर दरबारात करून दाखवितात. (६.२३८). समस्यापूर्ती काव्याची स्पर्धा आयोजित करणाऱ्या एका राजाच्या दरबारात चार जणांचे ब्राह्मण कुटुंब येते. त्यातील पिता-पुत्र संस्कृतातून समस्यापूर्ती करतात तर सासू व सून या दोघी तत्कालीन बोली गीतभाषेतून अर्थात् अपभ्रंशातून अतिशय सरस काव्यप्रस्तुती करतात. (६.१८८-१८९). चित्रकारकन्या कनकमंजिरीने फरशीवर रेखाटलेले आणि रंगविलेले मोरपीस इतके हुबेहूब असते की राजा ते वाकून उचलू लागतो. (५.९४). सर्व गणिकांना आणि काही प्रमाणात वेश्यांना नृत्य-नाट्य-गायनाचे पद्धतशीर शिक्षण दिले जात असावे.

वीणावादनात अत्यंत प्रवीण असलेली राजकन्या स्वत:च्या स्वयंवरात तिच्याहून सरसवीणा वाजविणाऱ्या वराची निवड करते. (६.६९). सिंहगुंफेत निवास करणाऱ्या पल्लीनाथाची (म्हणजे भिल्लप्रमुखाची) कन्या चतुर, रूपवान आणि विशेषत: वादविवादपटू असते. (६.२०५). शीलमती ही सामान्य कुटुंबातील मध्यमवयीन गृहिणी आहे. पशुपक्ष्यांची भाषा ती जात्याच जाणत असते. त्यामुळे तिच्यावर अनर्थप्रसंग ओढवतो. आपल्या विलक्षण भाषाज्ञानानेच ती त्यातून मार्ग काढते. (६.९७). तोरणपुर नगराच्या विद्याधर-राजकन्येला आकाशगमनाची विद्या अवगत असते. (५.१००). योग्य वेळी स्त्री-रूप आणि योग्य वेळी पुरुष-रूप ज्याच्या योगाने धारण करता येते-असे रसायन एका संन्यासिनीकडे असते. स्त्री-पुरुषांच्या भिन्न भिन्न क्षमता आणि तसे असण्याचे फायदे-तोटे - यावरचे हे जणू उत्कृष्ट भाष्यच कथालेखकाने व्यक्त केले आहे. (६.११०-११८).

केवळ नृत्य-गायनादि स्त्रीसुलभ कलांचे वर्णन जैन कथालेखक करीत नाहीत. लिपी, भाषा, गणित, वादविवादकौशल्य, काव्यरचना, चित्रकला आणि काही मोजक्या प्रसंगी सारथ्यकर्म आणि अश्वारोहण करणाऱ्या स्त्रियाही या कथांमधून दिसतात. शिक्षण नसल्याने पुरुषांकडून हेटाळणी केला जाण्याचा प्रसंग अपवादालाही आढळत नाही. आपल्या कलेचा गर्व, अहंकार असणाऱ्या स्त्रियांचे उल्लेख मात्र तुरळकपणे दिसतात.

जैनधर्मीय श्राविकांच्या (ज्या बहुतांशी गृहिणी आहेत) रीतसर धार्मिक शिक्षणाचे उल्लेख आवर्जून केले आहेत. जैन तत्त्वज्ञानातील नव-तत्त्वे आणि कर्मसिद्धांताचा विशेष अभ्यास - यामुळे त्यांना प्राप्त झालेला आत्मविश्वास, धीटपणा आणि वेगळे व्यक्तिमत्व मदनासुंदरीच्या पारंपरिक कथेत आणि इतरत्रही दिसून येते. (६.२७). जैन तत्त्वज्ञानावरील अतूट श्रद्धेच्या जोरावर काही श्राविकांनी पूर्ण कुटुंबाची मानसिकता बदलण्यासंबंधीचे उल्लेखही विशेष लक्षणीय आहेत. (१.७० ; ५.१३९-१४४).

### (६) आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह :

धर्म आणि जात-उपजात हे घटक विवाहसंबंध ठरविताना प्रामुख्याने अग्रभागी ठेवले जात असले तरी इ.सनाचे चौथे शतक ते १२ वे शतक या विशिष्ट काळातील या जैन कथांमध्ये कमीतकमी सात-आठ उदाहरणे तरी आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहांची येतात. विशेष गोष्ट अशी की बहुतांशी उभयतांच्या मर्जीने झालेल्या या विवाहांना समाज आणि कुटुंबियांकडून झालेल्या प्रखर विरोधाची उदाहरणे जवळजवळ नगण्य आहेत. धार्मिक अथवा जातीय सहिष्णुतेची ही उदाहरणे जैन कथालेखकांच्या वैचारिक उदारतेवर प्रकाश टाकतात. जैनधर्मीय स्त्रीची बाजू त्यांनी विशेष उचलून धरलेली दिसते. यातील पक्षपात जमेला धरून सुद्धा म्हणावेसे वाटते की - जातीय आणि धार्मिक अस्मितांच्या बुजबुजाटाच्या, या उत्तरआधुनिक काळात, या जैन प्राकृत कथा वेगळेपणाने उठून दिसतात.

'इलापुत्र' या प्रत्येकबुद्धाची कथा, एक जैन पारंपरिक कथा आहे. एका डोंबाऱ्याच्या मुलीवर नितांत प्रेम

बसलेला राजपुत्र, मुलीच्या पित्याच्या आग्रहाने डोंबाऱ्यांच्या कलेतील सर्व कौशल्ये, कशी आत्मसात करतो त्याचे प्रत्ययकारी वर्णन कथेत दिसून येते. (६.१५७). पारसिक (पारशी) कुटुंबातील एक अश्वाधिपती, घोड्यांचा व्यापार करीत असतो. घोड्यांची देखभाल करणाऱ्या एका सामान्य युवकावर, अश्वाधिपतीच्या लावण्यवती कन्येचे प्रेम बसते. ती बुद्धिमती कन्या, त्याला पगाराऐवजी दोन सुलक्षणी घोडे पित्याकडून मागून घेण्यास सुचविते. युवकाचा कष्टाळूपणा आणि युवतीची बुद्धिमत्ता, यामुळे त्यांचा विवाहही निर्वेध पार पडतो. (३.१९-२०). 'नायाधम्मकहा' या अर्धमागधी ग्रंथात, तेतलीपुत्र अमात्य हा श्रेष्ठी आणि पोट्टिला या सुवर्णकाराच्या कन्येचा वृत्तांत विस्ताराने येतो. आयुष्यात अनेक चढ-उतार येऊनही, ते एकमेकांची साथ सोडत नाहीत. (नायाधम्मकहा, अध्ययन १४, पृ.९४).

'मूलशुद्धिप्रकरण' नावाच्या प्राकृत ग्रंथातील कथा धर्मांतराच्या दृष्टीने विशेष राचक आहे. भागवतधर्मातील ब्राह्मण युवक आणि जैन कुलातील कन्या यांचा प्रेमविवाह होतो. वेगळ्या चालीरीतीमुळे युवकाचे कुटुंबीय त्यांना वेगळे घर करून देतात. श्राद्धासारख्या विशेष प्रसंगी ब्राह्मण युवक आपल्या एकत्र कुटुंबात जात असतो. 'खर्चिक पूजाविधी आणि श्राद्धविधी करण्यापेक्षा दीन-दुःखी लोकांना आपण दान द्यावे', असा सल्ला पत्नी देते. या कथेच्या निमित्ताने दोन्ही धर्मातील तात्त्विक मतभेदांवर तर प्रकाश पडतोच परंतु तर्कशुद्धपणे पटवून देण्याची जैनकन्येची हातोटीही नजरेत भरते. (५.१३९-१४४). याच ग्रंथातील दुसऱ्या कथेत जैनमुनींच्या प्रभावाने श्रावक झालेल्या एका कुलपुत्राची वैशिष्ट्यपूर्ण कथा येते. या कथेत तडजोड तर दाखविली आहे परंतु ती स्त्रीच्या मार्फत न दाखविता कुलपुत्राच्या पूर्वपरिचित देवतेकडून दाखविली आहे. देवता म्हणते, 'जिनांची पूजा कर पण मलाही पत्रीसाखरेचा नैवेद्य दाखव.' कुलपुत्र हिंदू देवतेची प्रतिमा जिनेश्वरांच्या प्रतिमेच्या खाली ठेवतो. नैवेद्य मात्र दाखवितो. जुने दैवतशास्त्र आणि नवे तत्त्वज्ञान यातील तडजोडीवर आधारित ही धर्मांतराची कथा, तत्कालीन समाजाच्या मनोवृत्तीवर निश्चित प्रकाश टाकते. (मूलशुद्धिप्रकरण, पृ.७१).

वाराणसीतील अग्निशर्मा ब्राह्मणाची जैनधर्मीय पत्नी शीला, 'पापाचा बाप कोण ?' असा प्रश्न विचारून त्याची परीक्षा घेते. स्वतः उत्तर न सांगता गुरूंकडून उत्तर देवविते. कथा खरी असो अथवा काल्पनिक, जैन लेखक स्त्रीचित्रणात मात्र यशस्वी झाले आहेत. (२.५). याखेरीज दासीकडे आकृष्ट झालेला कपिल ब्राह्मण व गुराख्याने दत्तक घेतलेल्या 'दामन्नक' नामक युवकाच्या प्रेमात पडलेली श्रेष्ठीकन्या विषा - यांच्या कथाही तितक्याच उद्‌बोधक आहेत. (५.६६ ; ६.२०).

### (७) न्याय मिळविण्यासाठी न्यायसंस्थेकडे मागितलेली दाद :

अन्याय झाला असता थेट न्यायाधिकरणात जाऊन स्त्रियांना तक्रार नोंदविता येत होती का ? राजा, न्यायाधिकारी इ. त्या तक्रारीची शहानिशा करीत असत का ? न्यायदानामध्ये स्त्री-पुरुष असा भेद न करता न्याय मिळत होता का ? - या सर्व दृष्टीने जैन कथांकडे पाहिल्यास खूपच आशादायी चित्र दिसते.

दोन विधवा स्त्रिया पतीच्या निधनानंतर एक लहान मूल आणि दागिने घेऊन राजदरबारी न्याय मागण्यासाठी येतात. न्यायाधीश, जो जैन पारंपरिक कथेत अभयकुमार मानला जातो, तो दोघींचे म्हणणे विस्ताराने ऐकून घेतो. 'जी खरी माता आहे ती वत्सल असणारच, मुलाचे अहित करणार नाही', या तत्त्वाचा वापर करून खऱ्या आईला मूल व धन मिळवून देते. (२.४३). कुमारपालप्रतिबोधग्रंथात राजा, अमात्य, पुरोहित आणि श्रेष्ठी हे चार सर्वोच्च सत्ताधरी एका महिलेच्या अडचणीचा, न्याय देण्याच्या निमित्ताने, कसा फायदा घेऊ बघतात - याची अत्यंत उद्‌बोधक कथा रंगवून सांगितलेली दिसते. आपली चोरलेली रत्ने परत मिळविण्यासाठी, त्या महिलेने बुद्धिमत्ता पणास लावून सत्ताधाऱ्यांना पंचांसमक्ष कसे लज्जित केले, ही घटना स्त्रियांच्या अंतरंगातील प्रखर शक्तीवर प्रकाश टाकते. भ्रष्ट राजसत्तेचे रूपही त्याचवेळी उघड करते. (६.१२४-१२५). वडिलांना न्याय मिळवून देण्यासाठी, त्यांची कन्या 'चंद्रकांता' थेट पुराव्यासकट राजदरबारी पोहोचते. (२.१०७). आपल्या वृद्ध चित्रकार पित्याला, अवाजवी कामदेऊन अन्याय करणाऱ्या राजाविरुद्ध 'कनकमंजरी' सज्ज होते. न्याय मिळवून देण्याची तिची पद्धत मात्र अतिशय अभिनव

आणि चित्रकारितेचे कौशल्य पणाला लावणारी असते. (५.९४).

### (८) स्त्री–देवता :

जैन तत्त्वज्ञानाची मूळ चौकट सृष्टिकर्त्या ईश्वराचे अस्तित्व नाकारते. परंतु त्यांचे एक स्वतंत्र दैवतशास्त्र मात्र आहे. चार गतींपैकी 'देवगति' ही एक गती आहे. त्यात देवांबरोबर स्त्री–देवताही आहेत. सोळा स्वर्गांमधील सर्व देवतांचे वर्ग, त्यांची सुखे, उपपातच्यवन–आयुर्मर्यादा यांचेही वर्णन येते. याखेरीज हिंदू धर्माच्या प्रभावाने श्रुतदेवता, विद्यादेवता, शासनदेवता, यक्ष–यक्षिणी, दिक्कुमारी, दिक्पाल इत्यादींचे चित्रण जैन ग्रंथात आणि जैन मंदिरे व शिल्पात दिसून येते. या शोधनिबंधाचा विषय असलेल्या दोनशे कथांमध्ये कोणकोणत्या स्त्री–देवता आहेत ते भाष्यसहित पाहू या.

एका कथेत गुप्त खजिन्याची देवता स्त्री–देवता आहे. (५.१२०). सेचनक हत्तीच्या कथेत वनदेवता हत्तीला हितोपदेश देते. (३.१२३). नगरदेवता रुष्ट झाल्या आणि त्यांनी वादळ, अंधकार, धुळीचे लोट निर्माण केले –असा उल्लेख स्त्रीचे रौद्र रूप रेखाटतो. (३.१४४). निष्ठावंत श्राविकेच्या पतीला एडक्याचे डोळे बसवून देणारी देवता उपकारकर्तीच्या रूपात दिसते. (५.११२). विमानात गरुडावर आरूढ झालेली शंख–चक्र–गदा–पद्मधारी देवता 'चक्रेश्वरी' आहे. (६.१६८). हिंदू पुराणांमधील विष्णुदेवाचे ते स्त्रीरूप आहे. पशुबळीवर भाष्य करून जीवदयेचे महत्त्व पटविणारी नगरदेवता जैनांच्या अहिंसातत्त्वाचे जणू स्त्रीरूप आहे. (६.१४). कुलदेवतेला नवस करून मुलगा–मुलगी झाल्यास दोघांचीही नावे देवतेवरून ठेवतात. (६.१५६ ; ६.७३). एका कथेत म्हटले आहे की माता मरण पावली. देवलोकात 'व्यंतरी' झाली. मुलाच्या जलोदर व्याधीवर तिने उपाय सुचविला. (६.२८). येथे लेखकाने देवलोकातही स्त्रीचे वात्सल्य–मातृत्व अबाधित ठेवले आहे. धनसंपत्तीचा मालक 'कुबेर' हा पुरुष आहे. तरी आराधना मात्र लक्ष्मीदेवतेची केली जाते. भक्तांना तीच संपन्न–विपन्न करते. (१.८२).

या प्रत्येक वर्णनात, रूढ देवतांच्या अंशांपेक्षा, स्त्री–स्वभावाचे अंशच अधिक ठळकपणे प्रतिबिंबित होतात.

### (९) स्त्रियांचे कामजीवन :

विरक्ती, संन्यास, दीक्षा, संयम – यांना अतिशय प्राधान्य देणाऱ्या जैनधर्मसंबंधित कथांमध्ये 'काम' या अंत:प्रेरणेला कितीसे महत्त्व दिलेले असणार, आणि त्यातही स्त्रियांच्या कामभावनेचा विचार केला गेला असेल की नाही, याची नक्कीच शंका उत्पन्न होते. शिवाय मुख्यत: साधुवर्गाने लिहिलेल्या या कथांत तशी अपेक्षाही रहात नाही. तथापि या बाबतीत वाचकांचा सुखद अपेक्षाभंग होतो. विरक्त, संयमी, एकनिष्ठ, ब्रह्मचारिणी, शीलवती अशा स्त्रियांचे चित्रण या प्राकृत कथांत आहेच परंतु स्त्रियांच्या कामभावनेचे जेवढे म्हणून आविष्कार दिसतात त्या सर्व तऱ्हा निरनिराळ्या संदर्भात अभिव्यक्त होतात.

महाराष्ट्री भाषेत रचलेली १ ल्या – २ ऱ्या शतकातली तरंगवती–कथा आज उपलब्ध नसली तरी तिचे संदर्भ जैन साहित्यात विपुलतेने आढळतात. अभ्यासकांच्या मते ती महाराष्ट्रीतील पहिली–वहिली रोमँटिक कथा (अर्थात् काव्यबद्ध) आहे. प्राकृत कथांचे नायक प्राय: श्रेष्ठी–वणिक्–सार्थवाह असल्याने त्यांच्या व्यावसायिक आयुष्यात त्यांना व्यापारानिमित्त, शिक्षणानिमित्त दीर्घकाळ परदेशी रहावे लागते. त्यांच्या विवाहित पत्नींचा तो कामभावनेच बहराचा काळ असतो. या प्रमुख कारणाने तिच्या वैयक्तिक, कौटुंबिक आणि पर्यायाने सामाजिक जीवनात अतृप्त कामभावनेमुळे निर्माण होणाऱ्या समस्या आणि उपाययोजना – या कळीच्या मुद्यापर्यंत जैन कथालेखक पोहोचले आहेत.

यासंबंधीच्या एका कथेत आपल्या बहकू पाहणाऱ्या सुनेला ताळ्यावर आणणाऱ्या सासू–सासऱ्यांची हकिगत समजते. (धर्मोपदेशमालाविवरण, पृ.१८१–१८२). सागरदत्त श्रेष्ठीपुत्र स्त्रीद्वेष्टा कसा होतो हे सांगताना असे वर्णन येते की, त्याची स्वत:ची आई, त्याला शिकवायला येणाऱ्या संन्यासी गुरूसोबत दुराचरण करताना दिसते. त्या प्रसंगाने

स्त्री-जातीचा द्वेष त्याच्या मनात शिरतो. (३.११०). दामन्नक नावाचा युवक वाटसरू मंदिरात झोपी गेलेला असतो. त्याच्या बलदंड शरीरयष्टीकडे बघून, गौर वर्ण आणि आकर्षक चेहऱ्याने मंदिरात आलेली श्रेष्ठीकन्या त्याच्याकडे आकृष्ट होते. (६.२१). स्वैरपणे वागण्याचे स्वातंत्र्य पुरुषांनाच आहे असे नाही, तर स्त्रियाही असे वागू शकतात हे कुमारपालप्रतिबोध ग्रंथातील एका कथेतून स्पष्ट होते. (६.१७२). नागिणी नावाची एक सामान्य गृहिणी किती कुटिल, दुष्ट, धूर्त आणि परपुरुषांबरोबर मजा मारणारी होती – हे एका विलक्षण कथेत आवर्जून सांगितले आहे. (६.२९). एका विवाहितेच्या नादी लागून, एक साधू-संन्यासाचा त्याग करून पुन्हा गृहस्थासारखा राहू लागतो – असेही एका प्राकृत कथेत नोंदविले आहे. (३.१३८).

महाशतक-रेवती यांच्या कथेत तर असे रंगविले आहे की आपल्या कामतृप्तीच्या वाटेत येणाऱ्या आपल्या बारा सवतींना रेवती ही स्त्री शस्त्रप्रयोग-विषप्रयोग करून त्यांचा काटा काढते. (४.१०३-१०४). महाभारतातील सुप्रसिद्ध द्रौपदीच्या बहुपतित्वाचा महाभारत-कथेतील कार्यकारणभाव जैन कथालेखकांना पसंत पडलेला दिसत नाही. 'भिक्षा वाटून घ्या'-असे सांगणारी कुंती आणि निमूटपणे ऐकणारे पांडव – यापेक्षा वेगळेच चित्र जैन कथेत दिसून येते. द्रौपदीची गेल्या दोन जन्मातली अतृप्त राहिलेली कामभावना कथेत विस्ताराने वर्णिली आहे. परिणामी ती स्वयंवरात स्वखुशीने पाच पांडवांना एकत्रितपणे वरमाला घालते असे म्हटले आहे. विशेष म्हणजे द्रौपदीच्या तीनही जन्मातील प्रबळ कामभावनेचे धिक्कारयुक्त-तिरस्कारयुक्त चित्रण नसून जैन लेखक तटस्थ निवेदकाची भूमिका घेतात.

स्त्री-पुरुष-समानतेची जाणीव गृहस्थांसाठी सांगितलेल्या व्रतातूनही स्पष्ट होते. पुरुषांसाठी 'स्व-दार-संतोष' हे व्रत सांगितले आहे तर स्त्रियांसाठी 'पर-पुरुष-निवृत्ति' हे व्रत सांगितले आहे. प्राकृत कथांमधून स्त्रियांच्या अंत:प्रेरित कामभावनांचे केलेले वर्णन निश्चितच वास्तववादी, समाजतलस्पर्शी आहे.

**(१०) स्त्रियांवरील लैंगिक अत्याचार आणि त्यावरील प्रतिक्रिया :**

'सूत्रकृतांग', 'दु:खविपाक' आणि 'प्रश्नव्याकरण' या अर्धमागधी ग्रंथांवर नजर टाकली असता असे दिसते की तत्कालीन गुन्हे जगतावर या तीन ग्रंथांमध्ये मिळून चांगलाच प्रकाश टाकला आहे. चांगले-वाईट, पाप-पुण्य, सदाचरण-दुराचरण या सर्व परस्परविरोधी जोड्यांना अतिशय स्वाभाविक व वास्तविक मानल्याने गुन्हेगारी जगताचे चित्रण कथाग्रंथातूनही कोठेही, हात राखून केलेले दिसत नाही. गुन्ह्यांच्या वेगवेगळ्या प्रकारांमध्ये 'स्त्रियांवरील लैंगिक अत्याचार' हा प्रमुख घटक दिसतो.

'वसुदेवहिंडी' ह्या आर्षप्राकृतातील ग्रंथात आरंभीच्या भागातच, लैंगिक अत्याचाराचा धिटाईने सामना करणारी धनश्री दृष्टोत्पत्तीस येते. शीलभंग करणाऱ्या राजसेवकाला मद्यातून गुंगीचे औषध देते. कमरेची तलवार काढून शिरच्छेद करते. (३.११०). 'कुमारपालप्रतिबोध' ग्रंथातही विवाहित पत्नीचे अपहरण करणाऱ्या नराधमाला वधाची शिक्षा देणे योग्य मानले आहे. (६.६३). नियतिवादाच्या आहारी जाणाऱ्या सद्दालपुत्र कुंभाराला, पौरुष-पराक्रमाचे महत्त्व सांगणारे भ. महावीर प्रश्न विचारतात, 'तुझ्या पत्नीशी गैरव्यवहार करणाऱ्या दुराचारी माणसाला, तू कोणती शिक्षा देशील ?' क्षणाचाही विलंब न लावता सद्दालपुत्र म्हणतो, 'मी त्याला चांगला बदडून काढीन. किंबहुना प्राणही घेईन.' (४.१००-१०१). 'अंतगडदशा' या अर्धमागधी ग्रंथात आजचे सर्व लैंगिक अत्याचार स्पष्ट करणारी 'अर्जुन' नावाच्या माळ्याची आणि त्याच्या स्वरूपसुंदर पत्नीची कथा येते. या कथेत gang-rape चा सविस्तर वृत्तांत येतो. त्यानंतर अर्जुनमाळ्याने पत्नीवर अत्याचार करणाऱ्यांना कसे यमसदनी पाठविले हाही वृत्तांत नमूद केला आहे. परंतु त्यांच्याही पुढे जाऊन अर्जुनमाळी एक serial killer कसा बनतो त्याचे सविस्तर वृत्त दिले आहे. पत्नीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या सहा पुरुषांबरोबर तो ज्याला honor killing असे म्हणता येईल अशा प्रकारे आपल्या पत्नीलाही मारतो. इतकेच नव्हे तर काहीही कारण नसताना सूड भावनेने रोजच सहा पुरुष व एक स्त्री यांना मारू लागतो. हत्येच्या दोषातून अर्जुनमाळ्याला मुक्त करण्यासाठी कथालेखकाने 'त्याच्यामध्ये यक्षाचा आवेश झाला', असे कारण दिले आहे. परंतु वास्तविक पाहिले तर ती समाजातील काही वर्गाकडून लैंगिक अत्याचाराला दिलेली प्रतिक्रिया

म्हणावयास पाहिजे. (४.११३).

वर दिलेल्या सर्व उदाहरणांमध्ये त्यावेळच्या समाजाचे एकमत दिसते की स्त्रियांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना एकच शिक्षा योग्य आहे व ती म्हणजे 'मृत्युदंड'. अहिंसेला सतत शिरोधार्य मानणाऱ्या जैन लेखकांनी स्त्रियांवरील्या प्रकारच्या अत्याचारांसाठी कोठेही तडजोड केलेली दिसत नाही.

## (११) वेश्याजीवनाचे प्रत्ययकारी चित्रण :

गणिका आणि वेश्या यांचा दर्जा सामाजिक स्तर, कार्यपद्धती, व्यवहार – सर्व काही वेगवेगळे आहे. अर्धमागधी भाषेतील आगमग्रंथात गणिका आणि वेश्या वेगवेगळ्या दिसतात. 'वसुदेवहिंडी' या चौथ्या शतकातील आर्ष प्राकृत अथवा जैन महाराष्ट्री ग्रंथातही वेश्या, वेश्यागृहे, कुट्टिनी-बाइया किंवा अक्का या त्यांच्या मालकिणी, वेश्यांकडे येणारे विविध प्रकारचे पुरुष, वेश्यांना वाटणारे कुलीन वैवाहिक जीवनाचे आणि सच्च्या प्रेमाचे आकर्षण – या साऱ्यांचे हृदयंगम चित्र वसुदेवहिंडीतून उभे राहते.

'कुमारपालप्रतिबोध' ह्या बाराव्या शतकातील ग्रंथामधील वेश्याव्यसनासंबंधीची 'अशोककथा' या शरीरविक्रयाच्या धंद्यासंबंधीच्या अनेक मूलगामी प्रश्नांना सरळ जाऊन भिडते. समाजात वेश्या का होतात ? कशा प्रकारे होतात दरिद्री पालकांकडून विकत घेतल्या जाऊन त्यांना यथेच्छ चोप देऊन नृत्य-गायन-अंगविक्षेपात कसे जुलमाने तयार केले जाते ? – या सर्वांची चिकित्सा या कथेत 'चंडा' नावाच्या 'कुट्टिनी'कडून करवून घेतली आहे. 'Human Trafficking' या आजच्या समस्येचा तेथे ऊहापोह केलेला दिसतो. नगरातल्या सर्व वेश्यागृहांच्या मालकिणींची 'असोसिएशन' म्हणजे 'मंडळ' असणे – हा उल्लेख चक्रावून टाकतो. (६.४९). वेश्यागृहाच्या बाबतीत एका पित्याने केलेला ग्राहक-मंचासारखा दावा मुळातच वाचनीय आहे. (६.५१).

दुसऱ्या एका कथेत, एक व्यापारी पुत्र सुभगा नावाच्या वेश्येवर अनुरक्त होतो. ती गर्भवती होते. तिच्या प्रसूतीच्या वेळी तो तिच्या पाठीवरील आडवा व्रण पाहतो. त्यावरून तिची पूर्व-हकिगत जाणून घेतो – असा उल्लेख आहे. यातील तथ्ये आजच्या परिस्थितीशी जुळतील इतकी तपशीलवार आहेत. (६.२०६).

स्थूलिभद्र मुनींच्या पारंपरिक कथेत, आपल्या नादी लागलेल्या मुनींना कोशावेश्या कशी ताळ्यावर आणते त्याचा वृत्तांत येतो. पायी पायी त्यांना नेपाळला जायला सांगून रत्नकंबल आणवते. त्यांच्या देखत तुकडे तुकडे करून गटारात फेकते. मुनिधर्माचे पावित्र्य आणि वेश्याजीवनाची अपवित्र दलदल – दोन्ही अधोरेखित करते. (६.२३५).

वस्तुत: सप्त-व्यसनांपैकी एक वेश्याव्यसन ! त्याचे जैन लेखकांनी केलेले प्रत्ययकारी वर्णन त्यांच्या सामाजिक जाणिवांवर प्रकाश टाकते.

## (१२) स्त्रियांचे स्वतंत्र आर्थिक व्यवहार, अधिकार आणि कर्तृत्व :

प्राकृत कथांमध्ये मध्यम आणि निम्नस्तरातल्या स्त्रियांचे आर्थिक अधिकार स्पष्टपणे नोंदवलेले नाहीत. परंतु अर्धमागधी कथांमध्ये राजे, अमात्य आणि श्रेष्ठी यांच्याकडील विवाहांमध्ये विवाहित कन्येला माहेरच्या माणसांनी दिलेल्या विविध प्रकारच्या भेटींना 'प्रीतिदान' असे म्हटले आहे. असेच 'प्रीतिदान' त्यांना सासरचे लोकही देत असत. – असे आवर्जून नोंदविले आहे. गाई, शेती, इतर आर्थिक गुंतवणूक तिच्या नावाने केली जाई. वृद्धीकरिता ते माहेरी ठेवले जाई. स्त्रीला गरज पडेल तेव्हा तिचे माहेरचे लोक योग्य ती मदत करीत. (४.१०३).

ज्ञाताधर्मकथा ग्रंथातील 'रोहिणी'ची कथा यासाठी वारंवार उद्‌धृत करण्यात येते. तिनेही सांभाळायला दिलेली गोष्ट माहेरी ठेवून अनेक पटींनी वृद्धिंगत केली. तिच्या नियोजनकौशल्यावर खूष होऊन सासऱ्यांनी घरातल्या सर्व आर्थिक अधिकाराची सूत्रे तिच्यावर सोपवली – असा उल्लेख येतो. (४.४२).

एका कथेत एका श्रेष्ठींच्या, अत्यंत भिन्न स्वभावाच्या दोन पत्नी वर्णिल्या आहेत. दुसरी पत्नी, पतीच्या दीर्घ गैरहजेरीत घर तर सांभाळतेच पण विश्वासू मुनीमजींना हाताशी धरून व्यापारही वृद्धिंगत करते, असे म्हटले आहे.

उपासकदशा या अर्धमागधी ग्रंथातील रेवती आपल्या सवतींच्या धनावर डोळा ठेवून त्यांना गुपचूप यमसदनी पाठविते. मृत सवतीची संपत्ती तिच्या हयात सवतीला देण्यासंबंधीची वेगळीच माहिती या कथेतून मिळते. समाजातील या सर्वतलस्पर्शी कथांमध्ये, 'माहेरून पैसा आण' – म्हणून सुनेला छळणाऱ्या कुटुंबाविषयी एकही कथा आढळत नाही. स्त्रीवादी विचारसरणीच्या दृष्टीने ही गोष्ट अत्यंत सकारात्मक मानली पाहिजे कारण अगदी बारीकसारीक तपशील देणारे प्राकृत कथालेखक इतकी महत्त्वाची गोष्ट लपवून ठेवतील असे वाटत नाही.

पतीचा आधार नसतानाही स्वकर्तृत्वावर उपजीविका, मुलांचे शिक्षण करणाऱ्या स्त्रिया विशेषत: अर्धमागधी ग्रंथात दिसतात. भद्रा सार्थवाही (३.१०२) ; स्थापत्या गृहिणी (नाया.शैलक अध्ययन पृ.२६१–२७१) आणि हालाहला कुंभारीण यांची उदाहरणे यासाठी ठळकपणे समोर येतात. हालाहला कुंभारीण आजीविक पंथाची उपासिका असते तिचे राजपथावर मोठे दुकान असते.

या तीनही स्त्रियांच्या कथेत त्यांच्या पतींचे, कुटुंबांचे उल्लेखच दिसत नाहीत.

स्त्री–पुरुष दोघांनीही उपजीविकेसाठी काम करण्याची पद्धत माळी, मासेमार – अशा समाजात दिसते. एरवी अर्थार्जनाची जबाबदारी सामान्यत: पुरुषांचीच दिसते. अर्थार्जनाची प्रेरणा, सल्ला किंवा कधीकधी हट्ट करणाऱ्या स्त्रियांचे उल्लेख मात्र अनेक कथांमध्ये दिसतात.

### (१३) चातुर्य आणि धूर्तता यातील सीमारेषा :

'चातुर्य' आणि 'धूर्तता' या दोघांनाही विशिष्ट प्रकारच्या बुद्धिमत्तेची पार्श्वभूमी आवश्यक असते. तरीही चांगल्या कामासाठी वापरल्यामुळे चातुर्य हे सद्गुण ठरते तर फसविण्यासाठी वापरली गेल्यामुळे धूर्तता हा दुर्गुण ठरतो. जैन कथालेखकांना या दोन्ही संकल्पनांमधील सीमारेषा चांगलीच माहीत आहे. 'स्त्रियांचे एकांगी चित्रण करावयाचे नाही', असा जणू त्यांचा निश्चयच आहे. कदाचित् प्रत्यक्ष समाज–निरीक्षणावरून त्यांनी तो काढलेला निष्कर्षही असेल. स्त्रियांचे चातुर्य आणि धूर्तत्व दोन्ही समरसतेने साकार करणाऱ्या या कथा स्त्री–पुरुष–समानतेचे एक वेगळेच परिमाण प्रस्तुत करतात.

आठव्या शतकात होऊन गेलेल्या 'हरिभद्र' नावाच्या आचार्यांनी 'धूर्ताख्यान' नावाचे व्यंगउपहासप्रधान खंडकाव्य लिहिले आहे. त्यात एकूण पाच धूर्तराज आहेत. चार व्यक्तिरेखा पुरुष आहेत. 'खंडपाना' नावाची स्त्री, ५०० धूर्त स्त्रियांची अग्रणी आहे. आपल्या युक्तीने आणि कृतीने चार पुरुष धूर्तराजांवर मात करणारी ही खंडपाना, स्त्रियांचा एक वेगळाच पैलू नजरेसमोर आणते. 'पाइयविन्नाणकहा' या ग्रंथातील एका कथेत धूर्त नर्तिका, श्रेष्ठींना कसे पेचात पकडते – याचे वर्णन येते. मोठीच युक्ती योजून नर्तिकेला मुंडन करायला लावून, श्रेष्ठींचा प्रिय पोपट तिला धडा कसा शिकवितो, त्याची ही रंजक कथा आहे. (१.९९). 'कुमारपालप्रतिबोधा'त कोंबड्याचे मांस अतिशय प्रिय असलेली चंडा नावाची अतिशय धूर्त स्त्री, कोंबडा कसा पळविते, त्याची कथा येते. शेजारणीसमोर बोलताना संवादातून रहस्य उघड होत आहे हे जाणवल्यावर, क्षणार्धात संवादाचा रोख बदलून कलाटणी देते. (६.१६३–१६६).

जैन प्राकृत ग्रंथांमध्ये स्त्रियांचे चातुर्य दाखविणाऱ्या कथांची मुळीसुद्धा वानवा नाही. स्त्रियांचा हा चातुर्यगुण लेखकांनी वेगवेगळ्या प्रसंगी, वेगवेगळ्या कार्यासाठी उपयोगात आणलेला दिसतो. एका कथेत सून धार्मिक आहे आणि सासरची माणसे भोगविलासी आहेत. त्यांच्यामध्ये नावालाही धार्मिकता नाही. साधूंच्या संवादातून ती म्हणते की, 'माझे वय १२ वर्षे, पतीचे ५ वर्षे व सासूचे ६ महिने आहे. सासरे तर अजून जन्मालाच आलेले नाहीत.' या चातुर्यपूर्ण वाक्याचा अर्थ समजावून सांगता–सांगताच पूर्ण कुटुंबाला ती धार्मिकतेचे महत्त्व पटविते. (१.७०).जैन संकल्पनेनुसार बुद्धीचे प्रकार चार आहेत. 'औत्पत्तिकी' म्हणजे जन्मजात, 'वैनयिकी' म्हणजे शिक्षणाने येणारी, 'कर्मजा' म्हणजे सरावाने येणारी व 'परिणामिकी' बुद्धी म्हणजे अनुभवातून आलेले शहाणपण, चातुर्य आणि व्यवहारज्ञान. परिणामिकीबुद्धीची कथा म्हणून एक ब्राह्मणी व तिच्या तीन मुलींचे उदाहरण दिले आहे. आपापल्या पतींचे आणि कुटुंबियांचे स्वभाव ध्यानात घेऊन, तीन मुलींपैकी प्रत्येकीला ती वेगवेगळा सल्ला देते. (१.११६).

‘मृगावती’ नावाच्या राणीवर भाळलेला ‘प्रद्योत’ राजा, तिला प्राप्त करण्याची पराकाष्ठा करतो. पतीच्या मृत्यूनंतर स्वत:चे शीलरक्षण करणाऱ्या मृगावतीचे चातुर्य, धैर्य, पातिव्रत्य आणि बुद्धिमत्तेची जोड लाभल्याने अधिकच झळाळून उठते. (६.१०६). ‘दामोदर’ नावाच्या ब्राह्मणाने हडप केलेली सात रत्ने, परत मिळविणाऱ्या जयसुंदरीचे चातुर्य कुमारपालप्रतिबोधग्रंथातील कथेत दिसून येते. (६.१२४-१२५).

धूर्तता आणि चातुर्य या दोहोंबाबत स्त्रिया पुरुषांपेक्षा कुठेही कमी नाहीत, हे दाखवून देण्यात जैनकथालेखक चांगलेच यशस्वी झाले आहेत.

**उपसंहार व निष्कर्ष :**

भारतीय विद्येच्या अभ्यासकांनी, समाजाचे अंतरंग समजावून घेण्याचे साधन म्हणून अर्धमागधी व जैन महाराष्ट्री भाषांमधील प्राकृत साहित्याचा विशेष उल्लेख व गौरव केलेला दिसतो. सकृद्दर्शनी असे दिसते की, या सर्व कथा पुरुषलेखकांनी लिहिलेल्या असल्यामुळे त्यातून बहुधा पुरुषप्रधान आणि स्त्रीला दुय्यम लेखणारे विचारच प्रस्तुत केलेल असतील. परंतु जैन प्राकृत कथासाहित्याचा समग्रतेने आढावा घेतल्यास असे दिसते की ‘सम्यक्त्व’ अर्थात् ‘पक्षपातरहित असणे’ - हा जैनधर्माचा मूलाधार, जैन प्राकृत कथालेखकांनीही जाणीवपूर्वक स्वीकारला आहे. स्त्रियांचे चित्रण करताना, ‘टोकाची निंदा आणि टोकाची स्तुती’ - दोन्ही विचारपूर्वक नाकारले आहे. मुख्यत: एक ‘माणूस’ म्हणून तिच्याकडे पाहिले आहे. पुरुषांच्या चित्रणात जेवढी विविधता आहे त्यापेक्षा कितीतरी जास्त छटा स्त्रीचित्रणात आहेत. मुख्य म्हणजे ‘पती म्हणजे परमेश्वर’, हे प्रारूप मनात धरून चित्रण नाही. पतीची ती सर्वार्थाने ‘सहचारिणी’ आहे, ‘सहगामिनी’ नाही. औपचारिक शिक्षण नसले तरी तिला स्वकर्तृत्वाने आलेले स्वतंत्र व्यक्तित्व आहे. तिचे अनुभवी, व्यवहारी व अचूक सल्ला देणारे व्यक्तिमत्व अखेर मनावर छाप उमटवून जाते. धार्मिक आणि उपदेशपर साहित्य असूनही, स्त्रियांच्या कामजीवनाचा केलेला विचार विशेष लक्षणीय आहे. फक्त विशिष्ट वर्गाचे चित्रण न करता समाजातील सर्व स्तरातील स्त्रियांची दखल घेतली आहे. येथे स्त्रीद्वेष्टे पुरुष आहेत तर पुरुषद्वेष्ट्या स्त्रियाही आहेत महाभारतातल्या श्रीकृष्णाचा, द्रौपदीचा अगदी वेगळ्या पातळीवर विचार केला आहे. मांसाहारी, अधार्मिक, मद्यपी आणि कामासक्त अशी एखादी स्त्री रंगविण्यासही ते मागे पुढे पहात नाहीत.

सारांश असा की, ‘वेदकाळात स्त्रियांचे स्थान उच्च होते व नंतर नंतर ते खालावत गेले’ - हे संस्कृत साहित्यिकांच्या निरीक्षणांचे प्रारूप, १२ व्या शतकापर्यंतच्या जैन कथांमधून समर्थनीय ठरत नाही. काही ठिकाणीतर जैन आगमातील अर्धमागधी चित्रणापेक्षा, जैन महाराष्ट्रीतील स्त्री-चित्रण अधिक प्रगल्भ होत गेलेले दिसते. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे यात वर्णिलेल्या स्त्रिया, केवळ जैन समाजातील नसून आम समाजातील आहेत. स्त्रियांच्याच बाबतीत बोलायचे तर, जैन नसलेल्या स्त्री-व्यक्तिरेखाच तुलनेने जास्त आहेत.

अगदी थोडक्यात सांगायचे म्हणजे, ‘जैनांच्या या प्राकृत कथांना दुर्लक्षित केले तर भारतीय स्त्रीविचारातील एका महत्त्वाच्या अंगास आपण वंचित राहू.’

**********

## संदर्भ-ग्रंथ-सूची

### अनुवादित ग्रंथ

अनोळखी गोष्टी (भाग १ ते ६), जैन प्राकृत कथा : अनुवाद - सुमतिलाल भंडारी, सं.-डॉ. नलिनी जोशी, सन्मति-तीर्थ प्रकाशन (२००७ ते २०११), पुणे

### मूलाधार ग्रंथ

**१**. अर्धमागधी आगम ग्रंथ : इ.स.पूर्व ५ वे शतक ते इ.स.चे ५ वे शतक
सूत्रकृतांग, व्याख्याप्रज्ञप्ति, ज्ञातृधर्मकथा, उपासकदशा, अंतकृद्दशा, विपाकसूत्र, उत्तराध्ययन, राजप्रश्नीय

२. जैन महाराष्ट्री ग्रंथ : इ.स.चे ५ वे शतक ते इ.स.चे १२ वे शतक
वसुदेवहिंडी : संघदासगणि व धर्मसेनगणि, ५ वे शतक
उपदेशपद : हरिभद्रसूरि, ८ वे शतक
कुवलयमाला : उद्योतनसूरि, ८ वे शतक
धर्मोपदेशमालाविवरण : जयसिंहसूरि, ९ वे शतक
मूलशुद्धिप्रकरण : प्रद्युम्नसूरि, ११ वे शतक
उत्तराध्ययनसूत्र, सुखबोधाटीका : देवेंद्रगणि/नेमिचंद्रसूरि, ११ वे शतक
मनोरमाकथा : वर्धमानसूरि, ११ वे शतक
कुमारपालप्रतिबोध : सोमप्रभसूरि, १२ वे शतक
आख्यानमणिकोश : देवेंद्रगणि, १२ वे शतक
आख्यानमणिकोशवृत्ति : आम्रदेवसूरि, १२ वे शतक
उपदेशपद, सुखबोधिनीटीका : मुनिचंद्रसूरि, १२ वे शतक
पाइय-विन्नाण-कहा (भाग १,२) : विजयकस्तूरसूरिश्वरजी, २० वे शतक

**********